महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

*युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....*



## महाविद्यालयासाठी माहिती पुस्तिका

२०२३-२४


**MAHARASHTRA INFORMATION TECHNOLOGY SUPPORT CENTER**

web : www.mitsc.co.in E mail : careerkatta365@gmail.com .: 7507652555



# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

## आयएएस आपल्या भेटीला

- ✻ राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- ✻ पोलीस भरती
- ✻ बँकिंग सेवा
- ✻ स्टाफ सिलेक्शन कमिशन
- ✻ केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)

ध्येयाच्या
वाटेवर
सातत्याने
३६५
दिवस

## उद्योजक आपल्या भेटीला

- ✻ उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
- ✻ व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
- ✻ वित्त व्यवस्थापन
- ✻ निर्णय क्षमता
- ✻ जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
- ✻ मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
- ✻ आधुनिक तंत्रज्ञान

**३६५ रूपयांमध्ये १००० दिवस मार्गदर्शन**
**५० add on कोर्सेस मोफत**

**नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी**
**७५०७६५२५५५ या नंबरवर आपले नाव करा**



**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**


Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.


क्र.: उशिसं/मवि-१/ करिअर कट्टा /२०२३/ ६८३८ दिनांक: .६.२०२३
- 7 JUN 2023

**परिपत्रक**

**विषय: राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये करिअर कट्टा विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविणेबाबत..**

वाचा- १. शासनपत्र क्र.: संकीर्ण २३२३/प्र.क्र.११५/मशि-२ दि. ६ जून २०२३
२. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र- कोल्हापूर यांचे पत्र क्र.: MITSC/OUT/FEBRUARY 2023/M/1313 दि. ९.२.२०२३

उपरोक्त वाचा क्र. २ ची प्रत व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावीत.

अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र प्रस्तावीत केल्यानूसार, करिअर कट्टा उपक्रमाची माहिती राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये देणे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणे या बाबी परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालयांस व विद्यापीठांस कळविणेबाबत संचालनालयास निर्देश प्राप्त झाले आहेत.

वाचा क्र. १ मधील सुचनांच्या अनुषंगाने चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये "करिअर कट्टा उपक्रमाची माहिती समाविष्ठ करण्याबाबत व विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत" सर्व संलग्नित महाविद्यालयांना, आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित विद्यापीठांनी संकलीत करुन एकत्रित स्वरुपात विभागीय सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण यांना व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी सदर अहवाल संचालनालयास सादर करावा. (महाविद्यालयांनी कार्यवाहीचा अहवाल परस्पर संचालनालयास अथवा शासनास ई-मेल द्वारे सादर करु नये.)

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव- १. मा. हे.सु.पाठक - अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र-महिला बँक बेसमेंट, खासबाग मैदान, कोल्हापूर- ४१६०१२.



**डॉ. विनोद मोहितकर**
**शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र शासन

## तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य


३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४७९
ई-मेल – desk7a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in


दिनांक : 1 2 JUN. 2023.

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२३/ १७२

1 2 JUN 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी **अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबत....**

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २३२३/ प्र.क्र.११५/ मशि-२, दिनांक ६.६.२०२३

२) अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक MITSC/OUT/FEBRUARY २०२३/M/१३१३, दिनांक ९.२.२०२३

शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार **" करिअर कट्टा "** उपक्रमाची माहिती उच्च शिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये देणे व या संस्थांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत निर्देश संदर्भाधीन शासन पत्रानुसार दिलेले आहेत. दिनांक ८.६.२०२३ रोजी मा.मंत्रीमहोदयांनी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर निर्देशाप्रमाणे तंत्रशिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकांमध्येही करिअर कट्टा उपक्रमाची माहिती आणि विद्यार्थ्यांचे नोंदणी अभियान राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून प्रसिध्द करण्यात येणा-या माहिती पुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक उपक्रमाची माहिती समाविष्ट करण्याबाबत आणि विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यात यावे. अधिक माहितीसाठी संदर्भाधीन पत्रांची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकरणी आपल्या अधिनस्त संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत्येक विभागाने संकलित करुन विभागनिहाय एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करावा. संस्थांना थेट संचालनालयास अथवा शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात येऊ नये या बाबीची विशेषत्वाने नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीसाठी :-
१.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई
२. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र कोल्हापूर (ई मेल द्वारे uvajagar@gmail.com)

# ३. सल्लागार मंडळ

**मा डॉ. शेखर गायकवाड**

मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य

**मा. डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी**

उपमहासंचालक, यशदा
पुणे

**मा.नामदेव भोसले**

सहसचिव, कौशल्य व उद्योजकता विकास
विभाग, महाराष्ट्र राज्य

**मा. संजय इंगळे**

सह सचिव
महसूल व वनविभाग, महाराष्ट्र राज्य

**डॉ. प्रफुल्ल पाठक**

सचिव
पॉवर सेक्टर स्कील कौंसिल

**डॉ. सोनाली लोहार**

ऑडिओलॉजीस्ट- व्हाईस थेरपिस्ट

**मा. प्रभाकर साळुंखे**

चेअरमन,
सुमित ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज

**मा. किशार गोरे**

संचालक
ग्लोबल नगरी (USA)

**मा. बिपिन जगताप**

संचालक
खादी व ग्रामोद्योग, महाराष्ट्र राज्य

**मा. सत्यजित पाटील**

सदस्य
जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर

**मा. ॲड. रवींद्र पाटील**

अध्यक्ष
बार असोसिएशन,व कौंसिल, इस्लामपूर

**मा. शेखर पोतनीस**

उद्योजक,
एस्क-१० टीम सोल्युशन्स

**मा. सचिन नांद्रे**

संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कवयित्री
बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

**मा. अश्विनी धुप्पे**

उद्योजिका

# ४. प्राचार्य प्रवर्तक

विभागीय प्रवर्तक –पुणे



मा. प्राचार्य डॉ. डी.डी.पाटील

विभागीय प्रवर्तक –नागपूर



मा.प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे

विभागीय प्रवर्तक – मुंबई



मा.प्राचार्य डॉ.अतुल साळुंखे

विभागीय प्रवर्तक –जळगाव



मा. प्राचार्य डॉ.स.ना. भारंबे

विभागीय प्रवर्तक–छ. संभाजीनगर



मा. प्राचार्य डॉ.भारत खंदारे

विभागीय प्रवर्तक –नांदेड



मा.प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण

पुणे



मा.प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे

नाशिक



मा.प्राचार्य डॉ. पी.व्ही. रसाळ

भंडारा



मा.प्राचार्य डॉ.अजयकुमार मोहबंसी

चंद्रपुर



मा.प्राचार्य डॉ.एल.एस. लडके

गडचिरोली



मा.प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर म्हशाखेत्री

गोंदिया



मा.प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले

धुळे



मा.प्राचार्य डॉ. मनोहर टी. पाटील

नंदुरबार



मा.प्राचार्य डॉ.महेंद्र रघुवंशी

छ. संभाजीनगर



मा.प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे

बीड



मा.प्राचार्य डॉ.रजनी शिखरे

बीड



मा.प्राचार्य डॉ.हरिदास विधाते

धाराशिव



मा.प्राचार्य डॉ. जयसिंग देशमुख

नांदेड



मा.प्राचार्य डॉ.जी.एन.शिंदे

परभणी



मा.प्राचार्य डॉ.बि.यू. जाधव

लातूर



मा.प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड

विभागीय प्रवर्तक –अमरावती



मा.प्राचार्य डॉ.धनंजय तळवणकर

# ४. प्राचार्य प्रवर्तक

हिंगोली



मा.प्राचार्य डॉ. करूणा देशमुख

वर्धा



मा.प्राचार्य डॉ. हरीभाऊ विरूळकर

रत्नागिरी



मा.प्राचार्य डॉ.अरविंद कुलकर्णी

पालघर



मा.प्राचार्य डॉ. भगवान रजपूत

सिंधूदूर्ग



मा.प्राचार्य डॉ. चंद्रकांत काकडे

ठाणे



मा.प्राचार्य डॉ.सुचित्रा नाईक

मुंबई



मा.प्राचार्य डॉ.प्रज्ञा प्रभू

अमरावती



मा.प्राचार्य डॉ. संजय खेरडे

यवतमाळ




मा.प्राचार्य डॉ. एम.ए. शहजाद

कोल्हापूर



मा.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर डिसले

सोलापूर



मा.प्राचार्य डॉ.अशोक एक्कलदेवी

# विभागीय समन्वयक

मुंबई



मा. प्रा. दुर्गेश फोंडेकर

अमरावती



मा.प्रा.डॉ. दिनेश खेडकर

नागपूर



मा.प्रा.डॉ. चंद्रशेखर इं. गित्ते

जळगाव



मा.प्रा.डॉ. जयेंद्र लेकूरवाळे

छ. संभाजीनगर



मा.प्रा.डॉ. राजेंद्र उढाण

कोल्हापूर



मा.प्रा.डॉ. धनाजी इंगवले

नांदेड



मा.प्रा.डॉ. सतीश चव्हाण

पुणे



मा.प्रा.डॉ. श्रीकांत देखमुख

# जिल्हा समन्वयक पुणे विभाग

पुणे–शहर



मा.प्रा. डॉ. शिवाजी भोसले

पुणे – ग्रामीण



मा.प्रा. डॉ. सुनील ओगले

पुणे–शहर



मा.प्रा. डॉ. प्रभाकर घोडके

पुणे–शहर



मा.प्रा. डॉ. अनिल जगताप

पुणे–शहर



मा.प्रा. डॉ. गणेश चव्हाण

पुणे–तांत्रिक



मा. प्रो. योगिनी राऊत

नाशिक– तांत्रिक



मा. प्रो. सीमा रविंद्र बाजी

नाशिक – ग्रामीण



मा.प्रा.डॉ. राकेश वसंतराव पाटील

नाशिक – शहर



मा.प्रा. डॉ. संदिप टिळे

अहमदनगर – दक्षिण



मा.प्रा. डॉ. विलास सुद्रिक

अहमदनगर –उत्तर



मा.प्रा. डॉ. नवनाथ नागरे

# जिल्हा समन्वयक मुंबई विभाग

रायगड – दक्षिण



मा.प्रा. डॉ. बबन सिनगारे

रायगड–उत्तर



मा.प्रा. डॉ. सम्राट जाधव

सिंधुदुर्ग



मा.प्रा. डॉ. अजित दिघे

ठाणे



मा.प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी

ठाणे



मा.प्रा. श्रृती सुनील पाटील

पालघर–शहर



मा.प्रा. प्राजक्ता शरद राऊत

पालघर – ग्रामीण



मा.प्रा. डॉ. दीपा वर्मा

रत्नागिरी



मा.प्रा.डॉ. सुनिल भादुले

रत्नागिरी



मा.प्रा.डॉ. अनिता जयपाल आवटी

## जिल्हा समन्वयक छ. संभाजीनगर विभाग

छ. संभाजीनगर शहर



मा.प्रा.डॉ. राजेश लहाने

छ. संभाजीनगर–ग्रामीण



मा.प्रा.डॉ. वैशाली पेरके

बीड– ग्रामीण पश्चिम



मा.प्रा.डॉ. दत्तात्रय नरसाळे

बीड – शहर



मा.प्रा.डॉ. रविंद्र काळे

बीड ग्रामीण पुर्व



मा.प्रा.डॉ.दिलीप भिसे

जालना–शहर



मा.प्रा.डॉ. माधव ढेरे

जालना – ग्रामीण



मा.प्रा.डॉ. विनोद जाधव

धाराशिव–ग्रामीण पूर्व



मा.प्रा.डॉ. संजय अस्वले

धाराशिव–ग्रामीण पश्चिम



मा.प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे

## जिल्हा समन्वयक नांदेड विभाग

नांदेड



मा.प्रा.डॉ. डी.आर.मुंडे

नांदेड



नांदेड–ग्रामीण



मा.प्रा.डॉ.प्रभाकर जाधव

नांदेड



मा.प्रा.डॉ. संतोष शेंबाळे

नांदेड – शहर



मा.प्रा.डॉ.पी.आर.मुट्ठे

परभणी–शहर



मा.प्रा.डॉ.दिगंबर रोडे

परभणी – ग्रामीण



मा.प्रा. डॉ. विजय भोपाळे

लातूर – ग्रामीण



मा.प्रा. डॉ. औदुंबर मुळे

लातूर – शहर



मा.प्रा.डॉ. शिवकुमार राऊतराव

हिंगोली



मा.प्रा.डॉ. दयाराम मस्के

# जिल्हा समन्वयक अमरावती विभाग

अमरावती



मा.प्रा.डॉ. गजानन रत्नपारखी

अमरावती



मा.प्रा.डॉ. उमेश कनेरकर

अमरावती



मा.प्रा.डॉ. गजेंद्रसिंग पचलोरे

अमरावती



मा.प्रा.डॉ. हरिश्चंद्र गजभिये

यवतमाळ



मा.प्रा.डॉ. रंजना जिवने

यवतमाळ



मा.प्रा.डॉ. रोहित वनकर

बुलढाणा – उत्तर



मा.प्रा.डॉ. प्रविण डाबरे

बुलढाणा – दक्षिण



मा.प्रा.डॉ. मनोज व्यवहारे

अकोला



मा.प्रा.डॉ. भाऊसाहेब गायकवाड

अकोला



मा.प्रा.डॉ. सोनल कामे

# जिल्हा समन्वयक नागपूर विभाग

नागपूर – मध्य



मा.प्रा.डॉ. विनोद खेडकर

नागपूर–दक्षिण,पश्चिम



मा.प्रा.डॉ. मनीषा पाटील

नागपूर – पश्चिम



मा.प्रा.डॉ. सुशांत चिमणकर

नागपूर – ग्रामीण पश्चिम



मा.प्रा.डॉ. अर्चना पाटील

नागपूर – ग्रामीण पुर्व



मा.प्रा.डॉ. ईश्वर वाघ

वर्धा – पूर्व



मा.प्रा.डॉ. संतोष यादव

वर्धा – पश्चिम



मा.प्रा.डॉ. अनुप गुंबळे

भंडारा



मा.प्रा. डॉ. संदीपकुमार सरैया

भंडारा



मा.प्रा.डॉ.संतोष जाधव

गोंदिया



मा.प्रा.डॉ.धर्मवीर चौहान

गोंदिया



मा.प्रा.डॉ. पुनम ठाकूर

गोंदिया



मा.प्रा.डॉ. सतीश सहारे

गडचिरोली



मा.प्रा.डॉ. राजकुमार मुसणे

गडचिरोली



मा.प्रा.डॉ. ललितकुमार शनवारे

चंद्रपूर



मा.प्रा.डॉ.अपर्णा धोटे

## जिल्हा समन्वयक पश्चिम महाराष्ट्र

सोलापूर – शहर



मा.प्रा.डॉ. राजशेखर शिंदे

कोल्हापूर – शहर



मा.प्रा.डॉ. अरूण पाटील

सातारा



मा.प्रा.डॉ. संदीप तडाखे

## जिल्हा समन्वयक उत्तर महाराष्ट्र

नंदुरबार



मा.प्रा.डॉ. उपेंद्र धगधगे

जळगाव



मा.प्रा.डॉ. विनोद नन्नवरे

धुळे– उत्तर



मा.प्राचार्य डॉ. निंबा वाल्हे

धुळे– शहर



मा.प्रा.डॉ.राजेंद्र ब्राम्हणे

धुळे



मा.प्रा.डॉ. प्रवीणसिंग गिरासे

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| १. | शुभेच्छा संदेश – शिक्षण संचलनालय | १ |
| २. | शुभेच्छा संदेश – तंत्र संचलनालय | २ |
| ३ | सल्लागार मंडळ | ३ |
| ४. | प्राचार्य प्रवर्तक | ४ |
| ५. | विभागीय समन्वयक | ५ |
| ६. | जिल्हा समन्वयक | ६ |
| ७. | संकल्पना– मा. यशवंत शितोळे | ११ |
| ८. | संपादकीय – प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे | १२ |
| ९. | संपादकीय – प्राचार्य डॉ. अनुश्री खैरे | १३ |
| १०. | करिअर कट्टयाचे विद्यार्थ्यांसाठी उपक्रम | १४–१९ |
| | आय.ए.एस. आपल्या भेटीला | |
| | उद्योजक आपल्या भेटीला | |
| | विद्यार्थ्यांसाठी माहिती पत्रक | |
| | कौशल्य प्रशिक्षण उपक्रम | |
| | ॲड ऑन कोर्सचे वेळापत्रक | |
| | करिअर संसद | |
| ११. | महाविद्यालयासाठीचे उपक्रम | २०–२७ |
| | मॉडेल कौशल्य विकास केंद्र | |
| | सेंटर ऑफ एक्सलन्स | |
| | सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी उद्योजक संसद | |
| | सामंजस्य करार आणि रोजगार मेळावे | |
| १२. | करिअर कट्टा पदाधिकारी कार्यपद्धती | २८–३१ |
| | महाविद्यालयीन समन्वयक | |
| | प्राचार्यांची भुमिका व जबाबदारी | |
| | प्राचार्य प्रवर्तकांची भूमिका व जबाबदारी | |
| | करिअर कट्टा जिल्हा समन्वयक | |
| | विभागीय समन्वयक | |
| | समन्वय बैठकीचे नियोजन | |
| १३ | दैनंदिन उपक्रम | ३२ |
| | भारतीय संविधानाचे पारायण | |
| | वृत्तवेध – चालू घडामोडींसाठी | |
| १४. | महाविद्यालयीन स्पर्धा | ३३ |
| १५. | आवश्यक पत्रांचे नमुने | |
| | समन्वयक नियुक्ती पत्राचा नमुना | ३४ |
| | समन्वयक बदल पत्राचा नमुना | ३५ |
| | करिअर संसद नियुक्तीचा नमुना | ३६ |
| १६. | करिअर कट्टा बोर्डचा नमूना | |
| | कार्यकृती आराखडा | |



मा. यशवंत शितोळे
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

# ७. संकल्पना

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी हा केंद्रबिंदू नजरेसमोर ठेवून आकारास येत असलेला एक महत्त्वकांक्षी उपक्रम म्हणजे ''करिअर कट्टा''. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सन्माननीय उदयजी सामंत यांच्या दूरदृष्टीतून अनेक महत्वपूर्ण बदल उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये होत असल्याचे आपण पाहत आहोत. कोरोनाच्या महामारी नंतर आपण सर्वजण पून्हा एकदा स्वत:ला जागतिक स्पर्धेमध्ये सिद्ध करण्यासाठी तयार करीत आहोत. हे करीत असताना उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थांना  समान पातळीवर मार्गदर्शनाची संधी उपलब्ध व्हावी, या विचाराने करिअर कट्टा कार्यरत आहे. या उपक्रमांमध्ये प्रशासकीय अधिकारी, यशस्वी उद्योजक त्याचबरोबर विविध तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जात आहे. नोकरी मागणाऱ्या हातांपेक्षा नोकरी निर्माण करणारे हात लोकांच्या समोर यावेत या उद्देशाने राज्य शासन व केंद्र शासनाच्या धोरणानूसार प्रत्येक महाविद्यालयांमध्ये इंक्युबेशन सेंटर असावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचबरोबर प्रत्येक महाविद्यालयांमध्ये एक मॉडेल कौशल्य विकास केंद्र असावे यासाठी देखील या उपक्रमांतर्गत प्रयत्न केले जात आहेत. शिक्षकांसाठी आवाजाची कार्यशाळा हा देखील एक अभिनव उपक्रम याअंतर्गत राबवला जात आहे. आपल्या महाविद्यालयात इंक्युबेशन सेंटर, वेगवेगळे सामंजस्य करार, रोजगार मेळावे, स्किल डेव्हलपमेंट सेंटर आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून नॅक मूल्यांकनामध्ये देखील मदत होईल अशी रचना या उपक्रमाची करण्यात आली आहे. ग्रामीण आणि शहरी हा भेद कमी व्हावा आणि केवळ भौगोलिक मर्यादा किंवा आर्थिक क्षमतांची कमतरता या कारणांमुळे कष्ट करण्याची तयारी असणारे होतकरू व गुणवंत विद्यार्थी चांगल्या रोजगाराच्या, व्यवसायाच्या आणि नोकरीच्या संधी पासून वंचित राहू नयेत, यासाठी चाललेला हा प्रयत्न यशस्वी होण्यासाठी राज्यातील विविध विभागाचे शिक्षण सहसंचालक, प्राचार्य व समन्वयक अतिशय महत्वाचे आहेत. आपल्या सहकार्याने हा उपक्रम जास्तीत जास्त विस्तारत आहे.

आणि हे करीत असताना महाराष्ट्र राज्याच्या तंत्र शिक्षण संचालक व उच्च शिक्षण संचालक यांनी देखील अतिशय महत्वाचे मार्गदर्शन व योगदान दिलेले आहे. हा उपक्रम जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावा यासाठी प्रयत्न करीत असतात. सहकार्य करणारे महाविद्यालय समन्वयक, जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक व तज्ञ मार्गदर्शक, ज्ञात अज्ञात सर्व हितचिंतक या सर्वांचे मन:पूर्वक आभार. हा उपक्रम जास्तीत जास्त निर्दोष व प्रभावी होण्यासाठी आपले अभिप्राय, सूचना निश्चित कळवाव्यात.

या उपक्रमावरील आपले प्रेम उत्तरोत्तर वृद्धींगत होत राहो हीच प्रार्थना.

मा. यशवंत शितोळे
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

# ८. संपादकीय



प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे
अध्यक्ष राज्यस्तरीय
सेंटर ऑफ एक्सलन्स समीती

देशाची मोठी तरूण लोकसंख्या लक्षात घेवून त्यांना कौशल्य आणि उद्योजकीय ज्ञान देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने साकारला जात आहे. या उपक्रमाची माहिती पुस्तिका आपल्या हाती देताना आम्हा सर्वांना अत्यंत आनंद होत आहे.

देशाच्या उज्वल भवितव्याचा विचार करता तरूणांना आपले ध्येय आणि उद्दीष्ट गाठण्यासाठी याचा मोठा उपयोग होणार आहे. महाराष्ट्रातील अभ्यासासाठी, शिक्षणासाठी शहरांकडे धाव घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या ठिकाणी मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून देणे या उपक्रमामुळे शक्य झाले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रोजगारासाठी कौशल्यांची गरज लक्षात घेवून या उपक्रमांतर्गत मॉडेल कौशल्य विकास केंद्र, इंक्युबेशन सेंटर तयार करण्यात येणार असून त्यासाठी महाविद्यालयांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळाव्यांचे आयोजन या उपक्रमाचा एक भाग आहे.

महाविद्यालयांना या उपक्रमांमध्ये समाविष्ट केल्याने महाराष्ट्रातील सर्व भागांमध्ये पोहोचणे आणि विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. यामध्ये महाविद्यालयीन समन्वयक, प्राचार्य प्रवर्तक नेमलेले असल्याने महाविद्यालयीन प्राचार्यांची जबाबदारी वाढलेली आहे. करिअर कट्टा अंतर्गत जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक यांच्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे सहज शक्य होणार आहे.

पदवीसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व पालक यांना राज्यातील कोर्सेसची माहिती, त्यासाठी लागणारी पात्रता, निकष, विषयाची सखोल माहिती, विविध पदांची ओळख याविषयी संपूर्ण ऑनलाईन महामेळावा अंतर्गत करून दिली जाणार आहे. तसेच १० जुलै ते १० ऑगस्ट दररोज सायंकाळी ६.०० वा. ३० तासांचा ऑनलाईन प्रशिक्षण कोर्स आयोजित करण्यात येणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रमांना महत्व दिले आहे. त्यामध्ये अंतर्भूत असणारे कोर्सेस करणे करिअर कट्टा उपक्रमामुळे शक्य होणार आहे. कौशल्य अभ्यासक्रम आणि विकासासाठी मूर्त रूप देण्याचा प्रयत्न या उपक्रमांद्वारे केला जाणार आहे.

या पुस्तिकेच्या माध्यमातून उच्च शिक्षण, शिक्षण संचलनालयाचे तसेच तंत्र संचलनालयाचे पत्र समाविष्ट केलेले आहे. करिअर कट्ट्याचे विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम, महाविद्यालयासाठीचे उपक्रम या विषयीची संपूर्ण माहिती या पुस्तिकेमध्ये देण्यात आलेली आहे. करिअर कट्टा पदाधिकारी कार्यपद्धती, नोंदणी प्रक्रिया, दैनंदिन उपक्रम, बैठक नियोजन, महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहान स्पर्धा याचीही माहिती या अंतर्गत देण्यात आलेली आहे. करिअर कट्टा अंतर्गत काम करणाऱ्या विभागीय आणि जिल्हा समन्वयकांची यादीही माहितीसाठी यामध्ये देण्यात आलेली आहे.

आपल्या विद्यार्थ्यांना रोजगारासाठी उच्च शिक्षणाबरोबरच कौशल्य आणि उद्योजकीय ज्ञान देण्याची आवश्यकता असून ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने सुरू केलेल्या प्रयत्नांना यश लाभेल आणि आपण सर्व मोठ्या संख्येने याला प्रतिसाद द्याल अशी खात्री आहे.

प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे
अध्यक्ष राज्यस्तरीय
सेंटर ऑफ एक्सलन्स समीती




प्राचार्या डॉ. अनुश्री खैरे
संगणक शास्त्र व गृहविज्ञान
महाविद्यालय, लोणी


# १. संपादकीय

महाराष्ट्रातील तमाम महाविद्यालयीन युवकांना अगदी माफक दरात महाराष्ट्र राज्य लोकसेवा आणि स्पर्धा परीक्षा तसेच उद्योजकतेचे मार्गदर्शन करणारं हक्काचं व्यासपीठ म्हणजे करिअर कट्टा ! विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची राज्यस्तरीय चळवळ म्हणजे करिअर कट्टा! भारतीय सर्वाधिक अधिकारी हे बिहार आणि बंगाल या दोन राज्यांमधून येतात. त्या ठिकाणी हे असे अधिकारी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करतात. ही व्यवस्था महाराष्ट्रात उपलब्ध नव्हती. ती करिअर कट्टयामुळे उपलब्ध झाली. स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना पदवीनंतर प्रयत्न करावे लागतात. पण करिअर कट्ट्यामुळे त्यांची महाविद्यालयात आल्यापासूनच तयारी सुरू होते. त्यामुळे वेळ वाचतो. विविध कोर्सेस अगदी माफक शुल्कात करण्याची संधी मिळते.

महाविद्यालयाच्या भौतिक रचनेचा पुरेपुर वापर स्वत: विद्यार्थ्यांना आणि परिसरातील विद्यार्थ्यांना ही देता येतो. महाविद्यालयाच्या एकूण गुणवत्तेत ही वाढ झाल्याने दर्जा सुधारतो.

अशा विविधांगी करिअर कट्ट्याचा एक भाग बनण्याची संधी मला मिळाली, हि माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. भविष्यातही प्रवाहात झोकून देऊन आनंदाने काम करण्याची माझी तयारी आहे.

करिअर कट्ट्याची ही माहिती पुस्तिका सर्वांसाठी मार्गदर्शक राहिल आपणां सर्वांच्या सहकार्यानेच मी हे काम करू शकले. मला ही संधी दिली आपले शतश: आभार!


डॉ. अनुश्री राजेंद्र खैरे,
प्रभारी प्राचार्य,
गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय,
लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर

## आय.ए.एस.आपल्या भेटीला

या उपक्रमांतर्गत पदवीच्या पहिल्या वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पहिल्या सेमिस्टरमध्ये तीस तासांचा दोन क्रेडिट साठीचा एक कोर्स दिला जाईल. यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी या सर्व ठिकाणी असणाऱ्या नोकरीच्या संधी, त्यांची परीक्षा पद्धती, त्यांचा अभ्यासक्रम व तयारी करण्याची नियोजनबद्ध पद्धती, याविषयी मार्गदर्शन करणारा एक कोर्स दिला जाईल.

१ कोणत्याही पद्धतीच्या स्पर्धा परीक्षा देत असताना आवश्यक असणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश असणारा स्पर्धा परिक्षा फौंडेशन कोर्स (२५० तास) हा पदवीच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना दिला जाईल. संध्याकाळी पाच ते सहा दररोज एक तास.

२. बँकिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधीसाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना १२० तासांचा बँकिंग परीक्षेची तयारी करण्याचा अभ्यासक्रम पदवीच्या दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांना दिला जाईल.

३. पोलीस भरती प्रशिक्षणासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२० तासांचा लेखी परीक्षेची तयारी करणारा अभ्यासक्रम पदवीच्या दुसऱ्या वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिला जाईल.

४. UPSC आणि MPSC च्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २५० तासांचा ॲडव्हान्स कोर्स उपलब्ध करून दिला जाईल.

५. सर्व पद्धतीच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक सराव चाचणी परीक्षा महिन्यातून एक या पद्धतीने घेतल्या जातील.

६. स्पर्धा परीक्षा विषयी तयारी करत असताना योग्य मार्गदर्शन मिळावं यापेक्षा तज्ञ प्रशिक्षकांच्या बरोबरच आजी–माजी सनदी अधिकारी (IAS, IPS, IRS, IFS) यांचे ऑनलाईन मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आठवड्याला एक या पद्धतीने ५२ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दिले जाईल. विद्यार्थ्यांना वेळोवेळी शासकीय नोकर भरतीसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे, त्यांची कागदपत्र तयार करण्यासाठीची माहिती देणे तसेच तांत्रिक बाबींची पूर्तता करून फॉर्म भरण्या पर्यंतची सर्व माहिती ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येईल. जिल्हा पातळीवर असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तसेच निवृत्त अधिकाऱ्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा विषयी फील्ड व्हिजीट आयोजित करून मुलांना जाणीव जागृतीचे काम केले जाईल.

## उद्योजक आपल्या भेटीला

महाविद्यालयातील युवकांचा उद्योग क्षेत्रातील सहभाग वाढावा, त्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कौशल्यांचा विकास करण्यासाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा अंतर्गत करण्यात आले आहे. जगभरातील उद्योग क्षेत्रातील चालू असणाऱ्या घडामोडी, देशांतर्गत व्यवसाय क्षेत्रात असणाऱ्या संधी, व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया संबंधीची माहिती अतिशय सोप्या पद्धतीने या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दिली जाते. हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबविला जात आहे. महाविद्यालयांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या उद्योजक विकास विभागाशी हा उपक्रम संलग्नीत करून सहज राबविता येणार आहे. या अंतर्गत विविध बँकांचे प्रतिनिधी, वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी उद्योजक, प्रशासकीय विभागाचे अधिकारी व तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मातृभाषेमध्ये उपलब्ध करून दिले जात आहे. उद्योजक हे औद्यागिकरणाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात. आज देशाला गरज आहे ती उद्योजकता विकासाची. उद्योजक हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला हातभार लावत असतात. उद्योजकाला योग्य असे नियोजन करावे लागते व कौशल्याचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून परिणामकारक रचना करावी लागते. या उपक्रमाद्वारे देशात उद्योजकता तयार होण्यासाठी उद्योजकीय संस्कार व उद्योजकीय प्रशिक्षण देऊन उद्योजक निर्माण करण्यासाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत उद्योजक, बँकिंग अधिकारी, व्यावसायिक सल्लागार व शासकीय योजना यांचा समावेश आहे. वर्षातून ५२ उद्योजक व संबंधित विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध असणार आहेत.

| महिना | आयएएस आपल्या भेटीला (सायं. ६ ते ७) | उद्योजक आपल्या भेटीला (सायं. ७ ते ८) |
|---|---|---|
| मार्च<br>एप्रिल<br>मे | * राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>* पोलीस भरती | * उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास |
| जून<br>जुलै<br>ऑगस्ट | * बँकिंग सेवा | * व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन |
| सप्टेंबर<br>ऑक्टोबर<br>नोव्हेंबर | * स्टाफ सिलेक्शन कमिशन | * वित्त व्यवस्थापन<br>* निर्णय क्षमता<br>* जोखीम व्यवस्थापन (Risk Management) |
| डिसेंबर<br>जानेवारी<br>फेब्रुवारी | * केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.) | * मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन<br>* आधुनिक तंत्रज्ञान |

| क्र. | वेळ | विषय |
|---|---|---|
| १. | ४ ते ५ | ॲड ऑन कोर्स – १ |
| २. | ५ ते ६ | ॲड ऑन कोर्स – २ |
| ३ | ६ ते ७ | IAS स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन |
| ४ | ७ ते ८ | उद्योजक विकासासाठी मार्गदर्शन |

* नियमीत सहभागी विद्यार्थ्यांना रू. ३७५ कॅशबॅक दिला जाईल. add-on course च्या परिक्षा शुल्कामध्ये प्रतिकोर्स ५०% सवलत

**अधिक माहितीसाठी**
**संपर्क : 7507652555**

## करिअर कट्टा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कोर्सच्या संदर्भातील नियम

* करिअर कट्टा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कोर्सच्या संदर्भातील नियम हे कोर्स निवडणाऱ्या महाविद्यालयांना व विद्यांर्थ्यांना लागू राहतील.
* कोर्सची परीक्षा देणे विद्यांर्थ्यांना बंधनकारक आहे.
* विद्यार्थ्यांनी विहित वेळेत परीक्षा दिली नाही तर त्यांना १० रू. परीक्षा फी भरून परीक्षा देता येईल. व या १० रू. चा विनियोग करीअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करण्यात येईल.
* ३६५ रू. भरून करिअर कट्टयाचे सदस्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व कोर्सेस मोफत शिकता येतील. अन्य विद्यार्थ्यांना कोर्स करावयाचे असल्यास प्रति कोर्स ३०० रू. प्रशिक्षण शुल्क भरावे लागेल.
* ऑगस्ट २०२३ पासून करिअर कट्टयाचे सभासद असलेल्या विद्यार्थ्यांना १५ Add on कोर्स साठी परिक्षा शुल्क ५०रू. मध्ये ५०% सवलत दिली जाईल.

## करिअर कट्टा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कोर्सचे नियम

* करिअर कट्टा अंतर्गत असणाऱ्या कोर्समध्ये बेसिक कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच ॲडव्हान्स कोर्स उपलब्ध राहिल.
* ज्या महाविद्यालयांनी स्वत:चा कोर्स तयार केला आहे अशा महाविद्यालयांना करिअर कट्टा उपक्रमांतर्गत कोर्सच्या कमिटीची मान्यता घेणे अनिवार्य असेल
* स्टँडर्ड कोर्स व प्रीमियम कोर्स अशा दोन प्रकारात कोर्सची विभागणी करण्यात आली आहे. स्टँडर्ड कोर्समध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सुरू असणाऱ्या कोर्सचा समावेश आहे. तसेच प्रीमियम कोर्स मध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत नव्याने सुरू होणाऱ्या कोर्स चा समावेश आहे.

# Add on Course Time Table

| Duration | Name of Course | Time |
|---|---|---|
| 16 August - 16 Sept. | Basic Concepts of Accounting | 4.00 to 5.00 |
| | Emotional Intelligence | 5.00 to 6.00 |
| 17 Sept.- 17 October | Cyber Law | 4.00 to 5.00 |
| | Leadership Development | 5.00 to 6.00 |
| 1 Dec. - 30 Dec. | Communication Skills & Personality Development | 4.00 to 5.00 |
| | Time & Stress Management | 5.00 to 6.00 |
| 1 January - 30 January | Financial Literacy | 4.00 to 5.00 |
| | Basic Entrepreneur Skills | 5.00 to 6.00 |
| 1 February - 2 March | Human Rights | 4.00 to 5.00 |
| | Right to Information Act | 5.00 to 6.00 |
| 2 May - 30 May | Digital Marketing | 4.00 to 5.00 |
| | Tourism Management | 5.00 to 6.00 |
| 1 June - 30 June | Renewable Energy | 4.00 to 5.00 |
| | Consumer Protection Act 2019 | 5.00 to 6.00 |
| 1 July - 30 July | Road Safety & Awareness Training | 4.00 to 5.00 |
| | Personality Development for Overseas Placement | 5.00 to 6.00 |

## करिअर संसद

करिअर कट्टा या उपक्रमामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रूची व सहभाग वाढावा तसेच त्यांच्या करिअरविषयी दृष्टीकोनामध्ये जास्तीत जास्त स्पष्टता यावी या उद्देशाने प्रत्येक महाविद्यालयांमध्ये कमीत कमी नऊ विद्यार्थ्यांचा सहभाग असणारी करिअर संसद बनवण्यात यावी त्याची नियमावली पुढीलप्रमाणे:

१. पदवीच्या दुसऱ्या वर्षामध्ये सहभागी असणाऱ्या किंवा त्यापुढील कोणत्याही वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश करिअर संसद मध्ये करण्यात यावा.

२. किमान ५०टक्के जागांवर मुलींची निवड करण्यात यावी.

३. कमीत कमी ९ विद्यार्थी करिअर संसद मध्ये असतील.

४. करिअर संसदेमधील विद्यार्थ्यांचा कालावधी एक वर्षाचा असेल.

५. प्रतिवर्षी १५ जुलै जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या करिअर संसदेचा स्थापना दिवस असेल.

६. करिअर संसदेमध्ये पुढील प्रमाणे पदांचा समावेश असेल.

१ मुख्यमंत्री
२ नियोजन मंत्री
३ कायदे व शिस्त पालन मंत्री
४ सामान्य प्रशासन मंत्री
५ माहिती व प्रसारण मंत्री
६ उद्योजकता विकास मंत्री
७ रोजगार स्वंयरोजगार मंत्री
८ कौशल्य विकास मंत्री
९ संसदीय कामकाज मंत्री
१० सदस्य

## मॉडेल कौशल्य विकास केंद्र

करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयांच्या सहकाऱ्यांनी तसेच खाजगी आस्थापना व संस्थांच्या मदतीने त्रिपक्षीय सामंजस्य कराराद्वारे कौशल्य विकास केंद्राची स्थापना केली जाणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सुसज्ज असे कौशल्य विकास केंद्र उभे करून, जिल्हा नियोजन समिती, राज्य शासन व केंद्र शासन तसेच विविध महामंडळाच्या असणाऱ्या प्रशिक्षण योजनांचा लाभ महाविद्यालयांमध्ये शिकणारे विद्यार्थी तसेच पासआऊट व ड्रॉप आउट विद्यार्थी यांना द्यावा आणि या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

महाविद्यालयाची उपलब्ध असणारी साधनसामग्री व भौगोलिक गरज याचा विचार करून अभ्यासक्रमाची निवड केली जाईल. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी नोंदणी करून शासकीय योजनेच्या नियम व अटींची पूर्तता करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असणार आहे. सदर कौशल्य विकास केंद्र मंजूर करून घेत असताना केंद्र शासनाने ठरविल्याप्रमाणे विहित नमुन्यातील केंद्र तपासणी शुल्क व कोर्स मंजूरीसाठीचे शुल्क महाविद्यालयाला भरावे लागणार आहे आणि महाविद्यालयास प्रति विद्यार्थी प्रति तास शिकवण्यासाठी करारात ठरल्याप्रमाणे मानधन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत वेळोवेळी उपलब्ध असणारे अभ्यासक्रम शासनाच्या नियम व अटींच्या पूर्तता करून राबविण्यात येतील.

# Centre Of Excellence

## पार्श्वभूमी :

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या निवडक महाविद्यालयांमध्ये **'Centre Of Excellence'** उभे केले जाणार आहेत. या मागील महत्वाची भूमिका अशी की, राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणात मुले शहरी भागांमध्ये स्थलांतरित होत असतात. जीवनातील उमेदीच्या काळातील अनेक वर्षे केवळ स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी घरापासून, गावापासून, पालकांपासून लांब राहणाऱ्या मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्याचे वातावरण तयार होते याचे प्रमाण राज्यामध्ये लाखोंच्या घरात आहे. खाजगी प्रशिक्षण संस्थांचे उद्देश वेगवेगळे असल्यामुळे सरसकट सर्व मुलांना प्रोत्साहन देऊन यामध्ये गुंतवून ठेवण्याचा एक प्रयत्न होत असतो आणि मोठ्या प्रमाणात ग्रामीण पालक व विद्यार्थी या दुष्टचक्रात अडकतात. स्पर्धा परीक्षेचे नियोजन करत असताना स्वत:च्या करिअरसाठी एक ''प्लॅन बी'' देखील तितका सक्षमपणे तयार ठेवला पाहिजे आणि एका योग्य वयानंतर करिअरचा मार्ग बदलून योग्य निर्णय घेतला पाहिजे, याचे मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभे करणे हा 'Centre Of Excellence' स्थापनेमागील महत्वाचा उद्देश आहे.

## संकल्पना

महाराष्ट्र राज्य शासनाकडून सध्या राज्यभरामध्ये सहा ठिकाणी **'"Pre IAS Training ''** सेंटरच्या माध्यमातून ७४० विद्यार्थ्यांच्या निवासी प्रशिक्षणाची यंत्रणा अस्तित्वात आहे. करिअर कटट्याच्या माध्यमातून राज्यभरामध्ये १०,००० विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी व्यवस्था निर्माण करणे तसेच राज्यातील महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय संस्कार घडावेत व उद्योग-व्यवसाय निर्माण करणारी युवा पिढी पुढे यावी, या उद्देशाने ५००० युवा उद्योजकांना महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय विकासासाठी आवश्यक कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईल. Centre of Excellence च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शहरातील स्थलांतर कमी करण्याचा तसेच नगण्य शुल्क आकारून विद्यार्थी आणि पालकांना स्थानिक पातळीवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. विद्यार्थी व पालकांसाठी तज्ज्ञांकडून समुपदेशन केले जाईल. उद्योग क्षेत्रामध्ये तसेच व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ज्यांनी आपलं कर्तृत्व सिद्ध केले आहे, अशा कर्तृत्व संपन्न व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली, नियंत्रणाखाली 'Centre Of Excellence' कार्यरत राहिल.

## स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी व अभ्यासिका

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे MPSC परीक्षेसाठी तयारीचे प्रमाण व केंद्र शासनाच्या वेगवेगळया नोकऱ्यांसाठी असणारे प्रमाण बघता महाराष्ट्रीयन विद्यार्थी तुलनात्मक दृष्ट्या केंद्र शासनाच्या नोकरीमध्ये कमी प्रमाणात तयारी करत असल्याचे लक्षात येते. यासाठी याची माहिती विद्यार्थ्यांना योग्य वेळी झाली पाहिजे. त्यांच्या तयारीसाठी अभ्यासवर्ग व प्रशिक्षण उपलब्ध झाले पाहिजे तसेच हे सर्व करत करताना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून शक्य तितक्याजवळ या गोष्टी उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जास्त विद्यार्थी संख्या असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये शंभर विद्यार्थ्यांची अभ्यासिका जी पूर्णवेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल. सदर अभ्यासिकेमध्ये ऑनलाईन लेक्चरची सुविधा असेल ज्यामध्ये केंद्रीय पद्धतीने संपूर्ण राज्यात एकाच वेळेला सर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आवश्यकता भासल्यास दिल्ली, मुंबई, पुणे या ठिकाणच्या तज्ञ अनुभवी प्रशिक्षकांची नियुक्ती देखील करण्यात येईल.

'Centre Of Excellence' या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सदर प्रक्रियेसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे, योग्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, त्यांचे फॉर्म भरणे आणि परीक्षेची पूर्वतयारी करून घेणे तसेच ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी तज्ञ व्यक्तींकडून मुलाखतीची तयारी करून घेणे या पद्धतीने उपक्रम राबवले जातील.

वेगवेगळ्या परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी सुविधा केंद्र उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन समुपदेशनासाठी सोय असेल. विद्यार्थी व पालकांची मागणी असल्यास समुपदेशनासाठी स्वतंत्र सेशनचे नियोजन करण्यात येईल.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेचा विचार करता त्यांना स्पर्धा परीक्षेऐवजी अन्य क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणे शक्य असल्यास याबाबतदेखील मार्गदर्शन केले जाईल.

## गुणवत्ता व नियंत्रण

१. १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयांमध्ये तसेच ज्या परिसरामध्ये १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी पदवीच्या पहिल्या वर्षाला असतील त्या परिसरामध्ये 'Centre Of Excellence' उभारण्यात येत आहे.

२. या सेंटरमध्ये १०० विद्यार्थी एकाच वेळी अभ्यास करू शकतील, अशी अभ्यासिकेची रचना करण्यात येईल. त्यासाठी लागणारे बेंचेस, लेक्चरसाठीचे interactive board उपलब्ध असतील.

३. त्याचप्रमाणे common facility center असेल ज्यामध्ये computer उपलब्ध करून विद्यार्थांसाठी आपली कागदपत्र स्कॅन करणे, परीक्षेचे फॉर्म भरणे, हॉल तिकीट generate करणे, प्रिंट काढणे या सोयी असतील.

४. त्याचप्रमाणे SSC/SSB/UPSC/MPSC या सर्व स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण चालतील व इतर वेळेला विद्यार्थी अभ्यासिकेत बसून स्वयं अध्ययन करतील.

५. अभ्यासिका सकाळी ०६.०० ते संध्याकाळी ०८.०० वाजेपर्यंत चालू असेल. यामध्ये संध्याकाळी ०५.०० ते ०८.०० online प्रशिक्षण असेल.

६. अभ्यासिकेचा मासिक खर्च निघावा यासाठी अग्रणी महाविद्यालय काही शुल्क आकारू शकतील, पण या माध्यमातून शुल्क ठरवत असताना क्लस्टरमध्ये येणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक यांच्याशी सल्लामसलत करून ठरवावे.

७. या सेंटर मध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर जसा फोकस असेल त्याचप्रमाणे त्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेकडेही लक्ष देण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांची Psychology Test घेण्यात येईल. यातून तो विद्यार्थी कोणत्या स्पर्धा परीक्षेसाठी तयार आहे हे कळेल. ऑनलाईन समुपदेशनाच्या माध्यमातून पालकांना आणि विद्यार्थ्यांना समुपदेशन करणेत येईल. परंतु कोणाला वैयक्तिक समुपदेशन हवे असल्यास पालकांच्या मागणीप्रमाणे वैयक्तिक समुपदेशनही करण्यात येईल.

## उद्योजकता विकास केंद्र

राज्यात सद्यस्थितीला उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी आवश्यक अशी व्यवस्था अस्तित्वात नाही. Entrepreneurship Development Cell, Incubation Center हे प्रत्येक महाविद्यालयामध्ये असावे असा राज्य व केंद्र शासनाच्या धोरणांमध्ये झालेला बदल विचारात घेता महाविद्यालयीन व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापक यांच्यापर्यंत हा विचार प्रभावीपणे पोहोचवणे आणि उद्योग क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांच्या, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व बँक प्रशासनाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, त्यांच्या उद्योजकीय विकासाला चालना देणे या उद्देशाने महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक सेंटरमध्ये ५० विद्यार्थ्यांच्या student Start-up कामकाजासाठी कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देणे हा 'Centre Of Excellence' चा महत्वाचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय संकल्पनांना विस्तारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक सल्लागार व्यक्तींची उपलब्धता विद्यार्थ्यांना करून देणे, राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या उद्योजकीय बदलांविषयी, तंत्रज्ञानाविषयी आणि कायद्याविषयी त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करून देणे, विद्यार्थी अणि उद्योजक यांचा सातत्याने संवाद आयोजित करून त्या माध्यमातून उद्योग जगतातील घडामोडी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असतानाच त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी 'Centre Of Excellence' कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या राजकीय नेतृत्वाच्या विकासासाठी विद्यार्थी संसद त्याच पद्धतीने उद्योजकीय नेतृत्व विकासासाठी प्रत्येक सेंटरमध्ये "Student Start-up Company" नोंदणीकृत असेल आणि विद्यार्थी संसदेमधील मंत्रिमंडळाप्रमाणेच या कंपनीमधील व्यवस्थापकीय प्रमुख, आर्थिक व्यवस्थापक प्रमुख, या पद्धतीच्या वेगवेगळ्या पदांवर काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा, यासाठी Student Start-up ला गती देण्यात येईल.

## उद्देश

१. जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊ शकत नाही त्या विद्यार्थ्यांसाठी या सेंटरमध्ये उद्योजकता विकास हा उपक्रम राबविण्यात येईल.

२. यामध्ये ५० विद्यार्थ्यांना ऑफिस चालवण्यासाठी लागणारा Set up उपलब्ध करून देण्यात येईल. यामध्ये conference room, desk व इतर सुविधा महाविद्यालयांकडून उपलब्ध करून दिल्या जातील.

३. एक वर्ष हे विद्यार्थी Student start up म्हणून काम करतील. या विद्यार्थ्यांपैकी महाविद्यालयाबरोबर नोंदणी करून स्टार्टअप चालू करणार असतील त्यांना रू.१,००,०००/- देण्यात येतील.

४. महाविद्यालयाला लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करणे, ग्रामीण भागातील वस्तू शहरी भागात उपलब्ध करून देणे व शहरी भागातील वस्तू ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे या प्रक्रियेमुळे एक Interconnected Hub निर्माण होऊ शकते व यातूनच विद्यार्थी उद्योग कसा करावा, हे समजू शिकतील.

५. यामध्ये जे विद्यार्थी प्रत्यक्ष कार्यानुभव घेतील त्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात येईल.

६. यामध्ये विद्यार्थी Branding, Packing, Logo making, Service provider model, IPR formalities, Time management, decision making या सर्व गोष्टी शिकतील.

## गुणवत्ता व नियंत्रण

१. या सगळ्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या भागातील प्रसिद्ध उद्योजक सल्लागार मंडळावर कार्यरत असतील.

२. विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एकदा मार्गदर्शन करण्यात येईल. ज्यामध्ये
पहिला आठवडा – बँकेचे अधिकारी बँकेच्या योजना,
दुसरा आठवडा – जिल्ह्यातील उद्योग केंद्राचे अधिकारी मार्गदर्शन, शासकीय योजना ,
तिसरा आठवडा – प्रायव्हेट कन्सल्टंट यांचे मार्गदर्शन,
चौथा आठवडा – आंतरराष्ट्रीय उद्योजक ऑनलाईन मार्गदर्शन करतील.

## नियम व अटी

१. क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी करिअर कट्ट्याला नोंदणी करणे आवश्यक आहे, याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाच्या समन्वयकांची असेल.

२. 'Centre Of Excellence' चे निर्णय घेत असताना क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक तसेच अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक, त्या जिल्ह्याचे प्राचार्य प्रवर्तक तसेच जिल्हा समन्वयक, त्या भागातील एक यशस्वी उद्योजक, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचा समावेश असलेल्या स्थानिक नियामक मंडळाच्या बैठकीत संगनमताने घेण्यात यावेत.

## Center Of Excellence नियामक मंडळ

१. प्राचार्य प्रवर्तक
२. जिल्हा समन्वयक
३. क्लस्टरमधील सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य
४. क्लस्टरमधील सहभागी महाविद्यालयाचे समन्वयक
५. अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य
६. अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक
७. यशस्वी उद्योजक
८. निवृत्त प्रशासकीय अधिकारी
९. विद्यार्थी प्रतिनिधी

३. करिअर कट्ट्याअंतर्गत Center Of Excellence चालवत असताना १०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभी करण्यासाठी जो रू. १०,००,०००/– निधी दिला जाणार आहे त्याची वितरण नियमावली पुढील प्रमाणे

१) प्रतिवर्षी २० % (रू. २,००,०००) या पद्धतीने निधी वितरण होईल.
२) पुस्तके, फर्निचर, डिजिटल साधनसामग्री ( interactive board / sound system)याचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार महाविद्यालयाचा असेल.
३) निधी वितरित करत असताना क्लस्टरमध्ये असलेल्या करिअर कट्टामधील सहभागी असणाऱ्या विद्यार्थी संख्येवर निधी वितरणाचे गुणोत्तर अवलंबून असेल.
४) करिअर कट्टयाकडून केंद्रीय पद्धतीने वस्तू खरेदी करून महाविद्यालयास वितरित केल्या जातील, यासाठी करिअर कट्ट्याने स्थापन केलेली खरेदी समिती निर्णय घेईल.
५) Centre Of Excellence साठी दिलेली जागा ( अभ्यासिका / Incubation Centre ) ही पूर्ण वेळ त्याच उद्देशासाठी वापरली जाणे आवश्यक आहे.
६) ५०% जागा या अग्रणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असतील, तर
२०% जागा या pass out विद्यार्थ्यांसाठी आणि
३०% जागा या आजूबाजूच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असतील .
७) **Center Of Excellence** अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या **Incubation Center** साठी क्लस्टरमधून नियमक मंडळाने १५ विद्यार्थ्यांची निवड **Student Start up** कंपनीचे पदाधिकारी म्हणून करावी.
८) **Incubation Center** चे पदाधिकारी म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांना नियोजन व्यवसायाची निवड करण्यासाठी नियामक मंडळ व निवडलेले पदाधिकारी यांनी वेगवेगळ्या संकल्पनांचे सादरीकरण घेऊन त्यामधून एका व्यवसायाची निवड करावी.
९) सदर निधी मधील १५ टक्के भाग हा व्यवस्थापकीय खर्चावर खर्च करता येईल उर्वरित ८५% भाग हा व्यवसायाचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वापरला जाणे आवश्यक आहे.

१०) सदर व्यवसाय करत असताना महाविद्यालय व करिअर कट्टा यांची आर्थिक जबाबदारी उपलब्ध करून दिलेल्या भांडवलाइतकीच मर्यादित राहील. याव्यतिरिक्त कोणत्याही पद्‌धतीची आर्थिक जबाबदारी / दायित्व व्यवसायातून पदाधिकाऱ्यांनी निर्माण केल्यास त्याची जबाबदारी त्यांची वैयक्तीक राहील.

११) Center Of Excellence अंतर्गत येणाऱ्या Incubation Center ला नियामक मंडळांने मान्यता दिलेल्या व्यवसायासाठी कोणतेही पद्धतीचे कर्ज घेता येणार नाही.

१२) महाविद्यालयाच्या आवारामध्ये व्यवसाय करत असताना त्या व्यवसायाचा कोणत्याही पद्धतीचा त्रास महाविद्यालयाच्या नियमित कामकाजावर होणार नाही याची दक्षता पदाधिकाऱ्यांनी घ्यावयाची आहे तसेच सदर व्यवसाय करत असताना कोणत्याही समाजविघातक गोष्टींना प्रोत्साहन मिळेल अशा बाबींचा समावेश व्यवसायामध्ये असू नये.

१३) मागील वर्षी दिलेला निधी वापरून केलेल्या व्यवसायातून काही नफा निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी मिळवला असल्यास त्याचे वितरण तीन समान भागांमध्ये करण्यात येईल यामध्ये विद्यार्थी पदाधिकारी, करिअर कट्टा व महाविद्यालय यांचा समावेश असेल.

१४) सदर निधी वापरून केलेल्या व्यवसायामध्ये १००% तोटा झाल्यास कोणत्याही पद्धतीची वसुली विद्यार्थी पदाधिकारी किंवा महाविद्यालय यांच्याकडून केली जाणार नाही, तसेच पुढच्या वर्षी दिल्या जाणाऱ्या निधीवर त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही.

१५) महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या व्यवसायामध्ये नफ्यातील करिअर कट्ट्याला मिळालेल्या नफ्याच्या हिश्श्यातील ५०% रक्कम पुढील वर्षी दिल्या जाणाऱ्या रु १,००,०००/- निधीमध्ये वाढवून दिले जातील.

१६) सदर व्यवसाय करत असताना विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक कायदेशीर बाबी, बाजारपेठेची माहिती, तसेच आर्थिक व्यवहार करत असताना घ्यावयाची काळजी याविषयी त्यांना सुरूवातीलाच प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

१७) Revenue generate झाल्यावर त्यातील काही भाग अग्रणी महाविद्यालयाचा असेल.

१८) CSR /उद्योग मंत्रालय /Skill development याचा Additional fund महाविद्यालयाला उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असेल.

१९) महाविद्यालयाच्या प्राधान्याप्रमाणे त्यांच्या सभा घेऊन, त्यांची गरज पाहून सेंटर चालू करण्यासाठी लागणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील.

## उद्योजक संसद

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्य वाढीस लागावे यासाठी महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय कामकाजाची व कंपनीच्या व्यवस्थापनाची माहिती व्हावी या उद्देशाने उद्योजक संसदेची निर्मिती केली जाईल. त्याची नियमावली पुढीलप्रमाणे असेल.

१. महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही वर्गातील १५ विद्यार्थ्यांची निवड उद्योजक संसदेसाठी केली जाईल.

२. कंपनी व्यवस्थापनामध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या पदनामाने सदर विद्यार्थ्यांना उद्योजक संसदेमध्ये संबोधण्यात येईल.

३. सदर उद्योजक संसदेला सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत प्रतिवर्षी रूपये १ लाख भांडवल उपलब्ध करून दिले जाईल.

४. सदर उद्योजकीय संसदेने आपल्या अवतीभोवतीच्या परिसराचा तसेच क्षमतांचा विचार करून एक उद्योजकीय संकल्पना निवडावी व तिच्या विस्तारासाठी काम करावे.

५. उद्योजक संसदेने मिळवलेल्या नफ्यातील नियमानुसार काही भाग त्यांना देण्यात येईल.

६. उद्योजक संसदेतील किंवा अन्य कोणत्याही विद्यार्थ्यांनी अपेक्षित किंवा मागणी केलेल्या तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिले जाईल.

७. राज्यभरातील उद्योग संसद मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना एकत्रित उद्योजकीय कौशल्याचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाईल.

## सामंजस्य करार

महाविद्यालयीन स्तरावर वेगवेगळी औद्यागिक आस्थापने तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांसोबत करार करून त्या माध्यमातून अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम राविण्यासाठी सहकार्य केले जाईल.

उदा. पोलीस भरती करार, Add on courses चा करार

## रोजगार मेळावे

महाविद्यालयातून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी, त्याचबरोबर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये असणारे पासआऊट आणि ड्रॉपआउट विद्यार्थी यांच्यासाठी वेगवेगळ्या खाजगी आस्थापनांमध्ये उपलब्ध असणाऱ्या नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासकीय आस्थापनांच्या सहकार्याने महाविद्यालय स्तरावर रोजगार मेळावे आयोजित करून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमांतर्गत केला जाणार आहे.

१ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना करिअर कट्ट्याच्या विविध उपक्रमाची माहिती व्हावी, या उद्देशाने शैक्षणिक वर्षांच्या प्रारंभी इंडक्शन उपक्रमाच्या माध्यमातून सर्व उपक्रम विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यशाळा घेणे. सद्यस्थितीला ऑनलाईन कार्यशाळा घेणे अपेक्षित.

२ करिअर कट्ट्याच्या माध्यमातून ऑनलाईन उपक्रम ज्या युट्युब चॅनलच्या माध्यमातून सर्वांसाठी आयोजित केले जातात, या युट्युब चॅनलवरील उपक्रमांची माहिती देणे, भारतीय संविधानाचे पारायण, वृत्तवेध– स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी या कार्यक्रमाच्या नियमित हजेरीसाठी मुलांना ते चॅनल सबस्क्राईब करावे यासाठी प्रेरणा देणे.

३ सायबर सिक्युरिटीसारखा कोर्स, यूपीएससीचे प्रशिक्षण असेल किंवा यासारखे जे विविध उपक्रम राबवले जात आहेत या उपक्रमांमधून मुलांची सातत्यपूर्ण उपस्थिती व सहभाग वाढावा, यासाठी विद्यार्थ्यांशी समन्वय साधणे.

४ उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा, यासाठी महाविद्यालयामध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या विभागांशी समन्वय साधणे आणि त्या विभागातील विद्यार्थ्यांच्या गरजांची माहिती पोहचविणे.

५ वेगवेगळ्या समाज माध्यमांचा, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणे.

६ महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन यांना या माध्यमातून NAAC व अन्य गोष्टींसाठी होणारा उपयोग समजून सांगणे व त्यांचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी मदत करणे.

७ नियमित बैठकीस उपस्थित राहून आपले प्रश्न मांडणे व या उपक्रमाची सातत्यपूर्ण माहिती अद्ययावत ठेवणे.

८ प्राचार्य प्रवर्तक, विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक व महाविद्यालयीन समन्वयक यांच्या समन्वयातून करिअर कट्टा उपक्रमाची जास्तीत जास्त निर्दोष पद्धतीने अंमलबजावणी करता येईल, यासाठी योगदान देणे.

हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा, यासाठी महाविद्यालयात प्राचार्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाविद्यालयीन समन्वयक व विद्यार्थी यांच्यामध्ये समन्वय साधत असताना करिअर कट्टा जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावा, यासाठी आपण सूचना व प्रतिक्रिया वेळोवेळी देत रहावे. त्याचबरोबर उपक्रमाच्यावतीने महाविद्यालयात प्राचार्यांच्या नियमित बैठका आयोजित केल्या असतील, त्यामध्ये उपस्थित राहून आपल्या सूचना तसेच उपक्रमाबाबत अद्ययावत माहिती घेवून सदर उपक्रम अधिकाधिक कार्यक्षमपणे महाविद्यालयीन स्तरावर राबविण्यासाठी समन्वयकांना व संबंधित सहकारी प्राध्यापकांमध्ये समन्वय साधण्यासाठी वेळोवेळी आढावा घेणे, अशी प्राचार्यांची महत्त्वाची जबाबदारी अपेक्षित आहे.

## प्राचार्य प्रवर्तकांची भूमिका व जबाबदारी

१. करिअर कट्ट्याकडून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती आपल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणे.

२. शिक्षण सहसंचालक कार्यालय तसेच विद्यापीठ व आपल्या जिल्ह्यातील महाविद्यालय यामध्ये करिअर कट्ट्याच्या उपक्रमासाठी योग्य तो समन्वय साधने.

३. प्राचार्य प्रवर्तक या नात्याने सेंट्रल पेक्षा स्थानिक नियामक मंडळांतर्गत चाललेल्या कामकाजाचे नियमन करणे.

४. करिअर कट्ट्याचे उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावेत यासाठी स्थानिक पातळवरील समस्या व सूचना राज्यस्तरीय बैठकीमध्ये मांडणे.

## करिअर कट्टा जिल्हा समन्वयक

- ❊ दर महिन्याला एक आपल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन समन्वयकांची बैठक घेऊन करिअर कट्ट्याच्या उपक्रमाविषयी आढावा घेणे व अद्ययावत माहिती देणे.
- ❊ महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य किंवा संस्थाचालक यांना वेळोवेळी येणाऱ्या शंकांचे निरसन करणे, आपल्या पातळीवर या शंका निरसन करणे, शक्य नसल्यास विभागीय समन्वयक किंवा करिअर कट्टा संबंधित प्रशासकीय व्यक्तींपर्यंत प्रश्न पोहोचवून तो सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.
- ❊ सदर उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यत पोहोचवण्यासाठी महाविद्यालय स्तरावर आयोजित उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे आणि करिअर कट्टा विषयाची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.
- ❊ उपक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावा, यासाठी महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी वेगवेगळ्या परिसंवादाचे आयोजन करणे.
- ❊ उपक्रमाच्यावतीने राज्य व जिल्हा पातळीवर होणाऱ्या वेगवेगळ्या घडामोडींची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी सदर उपक्रमाची योग्य त्या माध्यमांवर प्रसिद्धी देण्यासाठी प्रयत्न करणे.
- ❊ जिल्हा समन्वयक बैठकीमध्ये उपस्थित राहून आपल्या जिल्हयातील कामकाजाचा आढावा देणे आणि विभागीय समन्वयक यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या विभागांमध्ये जिल्ह्याचे काम उठावदार दिसण्यासाठी प्रयत्न करणे.

## करिअर कट्टा विभागीय समन्वयक

- ❊ दर महिन्याला एक याप्रमाणे आपल्या विभागातील सर्व समन्वयकांची बैठक घेऊन करिअर कट्ट्याच्या उपक्रमांविषयी आढावा घेणे व अद्ययावत माहिती देणे.
- ❊ महाविद्यालयीन समन्वयक व जिल्हा समन्वयक, प्राचार्य किंवा संस्थाचालक यांना वेळोवेळी येणाऱ्या शंकांचे निरसन करणे व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
- ❊ सदर उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यत पोहोचविण्यासाठी महाविद्यालय स्तरावर व जिल्हा स्तरावर आयोजित उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे आणि करिअर कट्टा विषयाची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.
- ❊ उपक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावा, यासाठी महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी वेगवेगळ्या परिसंवादाचे आयोजन करणे.
- ❊ उपक्रमाच्या वतीने राज्य व जिल्हा पातळीवर होणाऱ्या वेगवेगळ्या घडामोडींची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी सदर उपक्रमाची योग्य त्या माध्यमांवर प्रसिद्धी देण्यासाठी प्रयत्न करणे.
- ❊ विभागीय समन्वयकांनी बैठकीमध्ये उपस्थित राहून आपल्या विभागातील कामकाजाचा आढावा देणे आणि आपल्या विभागाचे कामकाज उठावदार दिसण्यासाठी प्रयत्न करणे.

## करिअर कट्टा उपक्रमांतर्गत नेहमी होणाऱ्या आढावा बैठकी संदर्भात नियोजन

करिअर कट्टा हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा आणि कार्यपद्धती जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावी, कार्यक्षमता वाढावी या उद्देशाने नेहमीच बैठकीचे आयोजन केले जाते त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे,

१. **राज्यस्तरीय सर्व समन्वयकांची बैठक**

राज्यातील सर्व महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयकांची नियमीत बैठक दर आठवड्याला शुक्रवारी सायंकाळी ७.०० वा. घेण्यात येईल.

२. **सर्व जिल्हा समन्वयकांची राज्यस्तरीय बैठक**

राज्यातील सर्व जिल्हा समन्वयकांची राज्यस्तरीय बैठक दर महिन्याच्या ०१ तारखेला सायंकाळी ०७.०० वाजता घेण्यात येईल.

३. **महाविद्यालयीन समन्वयकांची जिल्हास्तरीय बैठक**

जिल्हयातील सर्व महाविद्यालयीन समन्वयकांची बैठक महिन्यातून एका जिल्हा समन्वयकांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल.

जिल्ह्यात करिअर कट्टयाचे उपक्रम राबवित असताना येणाऱ्या अडचणी व उपक्रमाच्या वाढीसाठी व नियोजनासाठी या बैठकी घेतल्या जातील.

४. **प्राचार्य प्रवर्तकांची राज्यस्तरीय बैठक**

राज्यातील सर्व प्राचार्य प्रवर्तकांची बैठक प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी सायं. ०७.०० वा. होईल.

## वार्षिक उपक्रम दिनदर्शिका

| तारीख | कार्यक्रम |
|---|---|
| ०१ जानेवारी | कृतज्ञता दिन |
| १२ जानेवारी | युवा दिन |
| १६ जानेवारी | स्टार्ट अप दिन -Start Up Day |
| २५ फेब्रुवारी | 'करिअर कट्टा' वर्धापन दिन |
| ०८ मार्च | महिला दिन |
| ०१ मे | महाराष्ट्र दिन |
| २२ जून | स्वागत सोहळा |
| १५ जुलै | कौशल्य विकास दिन |
| ०९ ऑगस्ट | क्रांती दिन |
| २६ नोव्हेंबर | संविधान दिन |

## १. भारतीय संविधानाचे पारायण

संविधानाचे महत्व आजच्या तरूण पिढीमध्ये रूजवण्यासाठी करिअर कट्टा अंतर्गत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, भारत सरकार आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाचे पारायण या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे भारतीय संविधानात असणारी विविध कलमे, परिशिष्टे यांची माहिती व संविधानाचे महत्व अतिशय सोप्या भाषेमध्ये ॲड. धनराज वंजारी (माजी सहाय्यक पोलीस अधिकारी) या उपक्रमाद्वारे सर्वांपर्यंत पोहचवत आहेत. श्री. यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यत्ता केंद्र) व ॲड. धनराज वंजारी (माजी सहाय्यक पोलीस अधिकारी) यांनी हा उपक्रम जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी अतिशय नेटकी मांडणी केलेली आहे. तसेच आजच्या काळात असणारी संविधानाची स्थिती यावरदेखील अतिशय विवेकपूर्ण विवेचन केले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक या सर्वांसाठी हा उपक्रम https://youtube.com/c/uvajagar या युट्युब चॅनल वर सकाळी ०७.३० ते ०८.१५ या वेळेत असतो. तसेच याचे प्रमाणपत्र देखील दिले जाते.

## २. वृत्तवेध चालू घडामोडींसाठी

चालू घडामोडींच्या अभ्यासाची व्याप्ती पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तिन्ही टप्प्यांवर विस्तारलेली आहे. चालू घडामोडी हा नुसता एक घटक विषय नाही तर स्पर्धा परीक्षेत समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक विषयाशी अनिवार्यपणे जोडलेला एक महत्त्वाचा घटक विषय आहे. चालू घडामोडी मध्ये अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, तंत्रज्ञानातील बदल, विज्ञान विषयक माहिती अशा सर्वच विषयात उमेदवाराचे समकालीन आकलन तपासण्याचा प्रयत्न आयोगाद्वारे केला जातो. चालू घडामोडी हा स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचा पाया बनला आहे, हीच बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत भारताच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दररोजच्या घडामोडी आणि दररोजच्या वर्तमानपत्रातील येणाऱ्या बातम्यांचे स्पर्धा परिक्षेच्या दृष्टीने विश्लेषण करण्याच्या उद्देशाने वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक या सर्वांसाठी हा उपक्रम https://youtube.com/c/uvajagar या युट्युब चॅनेलवर सकाळी ११.३० वाजता असतो. तसेच याचे प्रमाणपत्र देखील दिले जाते.

# महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा

करिअर कट्ट्याच्या वतीने सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये दरवर्षी 'राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेचे' आयोजन करण्यात येणार आहे. ''महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा'' या नावाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून २०२३-२४ या कालावधीमध्ये सहभागी महाविद्यालयाने केलेल्या कामकाजाचे ५० मार्कांचे मूल्यमापन निवड समितीमार्फत करण्यात येईल व जिल्हास्तरीय महाविद्यालयाची निवड करण्यात येईल.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रथम येणाऱ्या जिल्हास्तरीय महाविद्यालयांमधून राज्यस्तरीय महाविद्यालयाची निवड करण्यात येईल.

सदर निवड प्रक्रिया १० फेब्रुवारी पूर्वी पूर्ण केली जाईल व २५ फेब्रुवारीला करिअर कट्ट्याच्या 'वर्धापन दिनानिमित्त' प्रतिवर्षी सदर महाविद्यालयांचा ''बक्षिस वितरण समारंभ केंद्रीय पद्धतीने'' आयोजित करण्यात येईल.

## महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा मानधन स्वरूप

### राज्यस्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा मानधन स्वरूप

राज्यस्तरीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास
एक लाख रूपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

राज्यस्तरीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास
पंचाहत्तर हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

राज्यस्तरीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास
पन्नास हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

### जिल्हास्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा मानधन स्वरूप

जिल्हास्तरीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

जिल्हास्तरीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

जिल्हास्तरीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

जिल्हास्तरीय स्पर्धेत 'दोन उत्तेजनार्थ' महाविद्यालयांची निवड करण्यात येईल त्यांना प्रत्येकी ''सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र'' देऊन गौरविण्यात येईल.

**उत्कृष्ट प्राचार्य, जिल्हास्तरीय उत्कृष्ट समन्वयक, विभागीय स्तरावर उत्कृष्ट समन्वयक व राज्यस्तरीय उत्कृष्ट समन्वयक स्पर्धा**

या प्रत्येकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल. स्पर्धेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या सर्व महाविद्यालयांना व समन्वयकांना याबाबतची सविस्तर माहिती कळविण्यात येईल.

### स्पर्धेविषयी नियम व अटी

* महाविद्यालयांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी एकूण विद्यार्थी संख्येमधून १०% गळती वजा करावी. येणाऱ्या संख्येच्या १०% किंवा १०० यापैकी जी संख्या लहान असेल ती संख्या महाविद्यालयांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवश्यक विद्यार्थी संख्या असेल.
* उत्कृष्ट ब्रँड ॲम्बेसिडर विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच उत्कृष्ट तालुका समन्वयक, या दोन वर्गाचा स्पर्धेमध्ये नव्याने सहभाग करण्यात येईल.

## समन्वयक नियुक्ती पत्राचा नमुना

प्रति,
मा. अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,
महाराष्ट्र राज्य.

विषय : महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयएएस आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला हा उपक्रम राबवून याबाबत महाविद्यालय समन्वयक नियुक्तीची माहिती सादर करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयएएस आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला उपक्रम राबविण्याकरीता महाविद्यालय समन्वयक नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचा योजनेमध्ये महभाग करून घ्यावा ही विनंती.

| अ.क्र. | उपक्रम | समन्वयकाचे नाव | मोबाईल क्रमांक | व्हाट्स अप क्रमांक | ई-मेल आय.डी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आय.ए.एस. आपल्या भेटीला | | | | |
| २ | उद्योजक आपल्या भेटीला | | | | |

संदर्भीय पत्रात निर्दिष्ट केलेल्या प्रपत्रात माहिती सादर करीत आहोत करिता आपल्या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

प्राचार्य
प्राचार्यांचे नाव
महाविद्यायाचे नाव

सही व शिक्का

प्रति,
मा. अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
महाराष्ट्र राज्य

विषय : महाविद्यालयीन समन्वयक बदलाबाबत....

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती अशी की महाविद्यालयाचे करिअर कट्टाचे समन्वयक यामध्ये बदल करण्यात आला असून ती माहिती आपल्या माहितीस्तव पाठवत आहे.

महाविद्यालयाचे पूर्वीचे समन्वयकाचे नाव

| अ.क्र. | समन्वयकाचे नाव | समन्वयक विभाग | ईमेल आय.डी. | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| १ | | आय.ए.एस. आपल्या भेटीला | | |
| २ | | उद्योजक आपल्या भेटीला | | |

महाविद्यालयाच्या नवीन समन्वयकाचे नाव

| अ.क्र. | समन्वयकाचे नाव | समन्वयक विभाग | ईमेल आय.डी. | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| १ | | आय.ए.एस. आपल्या भेटीला | | |
| २ | | उद्योजक आपल्या भेटीला | | |

संदर्भीय पत्रात निर्दिष्ट केलेल्या प्रपत्रात माहिती सादर करीत आहोत.
करिता आपल्या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

प्राचार्य
प्राचार्यांचे नाव
महाविद्यायाचे नाव

सही व शिक्का

प्रति,
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान
सहाय्यता केंद्र,
महाराष्ट्र राज्य.

विषय : सन २०२३-२४ च्या करिअर संसदेची माहिती देण्याबाबत...

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कविण्यात येते की, महाविद्यालयांमध्ये २०२३-२४ साठी करिअर संसदेची स्थापना करण्योत आलेली आहे. सदर संसदेची माहिती विहित नमुन्यामध्ये आपल्या माहितीसाठी सादर करत आहोत. तरी याची नोंद घ्यावी, ही विनंती.

| क्र. | पदनाम | विद्यार्थ्यांचे नाव | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | मुख्यमंत्री | | |
| २. | नियोजन मंत्री | | |
| ३. | कायदे व शिस्त पालन मंत्री | | |
| ४. | सामान्य प्रशासन मंत्री | | |
| ५. | माहिती व प्रसारण मंत्री | | |
| ६. | उद्योजकता विकास मंत्री | | |
| ७. | रोजगार स्वंयरोजगार मंत्री | | |
| ८. | कौशल्य विकास मंत्री | | |
| ९. | संसदीय कामकाज मंत्री | | |
| १० | सदस्य | | |

आपला विश्वासू

प्राचार्यांचे नाव ____________________

महाविद्यालयाचे नाव ____________________ सही व शिक्का

## महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
### यांच्या संयुक्त विद्यमाने

महाविद्यालय कोड

महाविद्यालय लोगो

# करिअर कट्टा

*युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....*

महाविद्यालयाचे नाव : ..............................

प्राचार्यांचे नाव : ..............................

महाविद्यालयीन समन्वयकाचे नाव : ..............................

## करिअर कट्टा अंतर्गत समाविष्ट उपक्रम

1000 दिवस सातत्याने मार्गदर्शन

- आय.ए.एस. आपल्या भेटीला
✲ राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
✲ पोलीस भरती
✲ बँकिंग सेवा
✲ स्टाफ सिलेक्शन कमिशन
✲ केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (UPSC)

- उद्योजक आपल्या भेटीला
✲ उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
✲ व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
✲ वित्त व्यवस्थापन
✲ निर्णय क्षमता ✲ जोखीम व्यवस्थापन
✲ मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
✲ आधुनिक तंत्रज्ञान

- भारतीय संविधानाचे पारायण
- पर्यावरण शास्त्र अभ्यासक्रम
- सेंटर ऑफ एक्सलन्स
✲ स्पर्धा परीक्षा पुर्व तयारी व अभ्यासिका
✲ उद्योजकता विकास केंद्र
- मॉडेल स्किल डेव्हलपमेंट सेंटर

50 ॲडऑन कोर्सेस मोफत

हेल्पलाईन नं. : 750 765 2555 ◀ नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी आपले नाव या नंबरवर व्हॉटस्ॲप करा.

महाविद्यालयीन समन्वयक :

## कार्यकृती आराखडा

महाविद्यालयाचे ऑन बोर्डिंग करून घेणे

महाविद्यालयामध्ये करिअर कट्टा फलकाचे अनावरण करून घेणे.

महाविद्यालयाच्या माहिती पुस्तकांमध्ये करिअर कट्या विषयी माहितीचा समावेश करून, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळीच करिअर कट्ट्याचे नोंदणी शुल्क भरून घेण्याची व्यवस्था करणे.

करिअर कट्याच्या यादीमधील ॲड ऑन कोर्स महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निवडून त्याची यादी घोषित करणे.

पहिल्या वर्षाच्या इंडक्शन प्रोग्रामच्या वेळी विद्यार्थ्यांच्या मोबाईल मध्ये करिअर कट्टा ॲप डाऊनलोड करावयास सांगणे व करिअर कट्याविषयी संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देणे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रात, विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या ३० तासांच्या करिअरच्यासंधी या कार्सेसची माहिती विद्यार्थ्यांना देवून सर्व विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील यासाठी प्रयत्न करणे.

महाविद्यालयीन समन्वयकांच्या नियमित बैठकीला उपस्थित राहणे.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग
आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

*युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....*

## करिअरच्या संधींचा ऑनलाईन महामेळावा

उच्च शिक्षणात पाऊल ठेवताना हवी महत्त्वाची जाणीव-जागृती..!

**30 तासांचा ऑनलाईन प्रशिक्षण कोर्स**
**10 जुलै ते 10 ऑगस्ट**
**दररोज सायं. 6.00 वा.**

**पूर्णपणे मोफत !**

**आजच सबस्क्राइब करा..**

YouTube

https://youtube.com/@uvajagar

## पदवीसाठी प्रवेश घेणाऱ्या आणि घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांसाठी...

- वैशिष्ट्ये :

1. राज्यातील 5000 पेक्षा जास्त महाविद्यालयातील लाखों विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाचा महामेळावा
2. केंद्रीय व राज्य पातळीवरील विविध स्पर्धा परीक्षांची सखोल माहिती
3. स्पर्धा परीक्षांची पात्रता, निकष, अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती
4. विविध पदांची ओळख आणि कार्यपध्दती
5. उच्चपदस्थ अधिकारी व तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन
6. उद्योजकता विकास आणि परदेशी शिक्षण व नोकरीच्या संधी या विषयी मार्गदर्शन

UPSC | IBPS Exam | SBI

**हेल्पलाईन नं. : 750 765 2555**

◄ नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी आपले नाव या नंबरवर व्हॉटस्अ‍ॅप करा.